ही कसली मिरवणूक! तमाशा होता
राजा तर अगदीच नंगा होता

सगळे म्हणत होते वाहवा! वाहवा!
किती सुंदर पोषाख! सुंदर राजा
पहावा!

तेवढ्यात एक छोटा मुलगा आला
टाळ्या वाजवून लगेच म्हणाला

राजा नागड धुय्या! नागड धुय्या राजा!
बघा तरी गंमत! बघा तरी मज्जा!



# नागड धुय्या राजा!

लेखिका : कमला बक़ाया

चित्रकार : ऑड्रे कुमार

मराठी अनुवाद : शोभा भागवत



**नागड धुय्या राजा!**

लेखिका : कमला बक़ाया

चित्रकार : ऑड्रे कुमार

मराठी अनुवाद : शोभा भागवत

कृतज्ञता : अरविंद गुप्ता

प्रकाशक :
कजा कजा मरू प्रकाशन
गरवारे बालभवन
सारसबागेसमोर, पुणे - ४११००२
दूरध्वनी - २४४४२१०९

प्रकाशन : १२ डिसेंबर २०१२

मुद्रक : मुद्रा, ३८३ नारायण पेठ, पुणे - ३०

किंमत : ₹ २५/-

# नागड धुय्या राजा!

लेखिका : कमला बक़ाया

चित्रकार : ऑड्रे कुमार

मराठी अनुवाद : शोभा भागवत



एक होता राजा, त्याला हौसच फार
कपड्यांची त्याला, आवडच फार

राजवाड्यात यायचे, कापडांचे व्यापारी
दिवसा काय रात्री काय, फेरीवर फेरी

किती कापडं रेशमाची, किती होती मखमल
राजापाशी होती भारी, ढाक्क्याची मलमल

व्यापाऱ्यांची होती, मजाच मजा
कापड समोर आलं की, घेतलंच समजा

शिवायचा रोज नवे कपडे भारंभार
राजाच्या आनंदाला, नसे पारावार

राजाची नजर तरी, भटकत होती
प्रजेला ही गोष्ट खटकत होती

राजाला वेडबीड, लागलंय का काय?
कापडं आणि कपडे, चाललंय काय?

इकडे पहावं कपडे, तिकडे पहावं कपडे
ढिगावर ढीग, कपडेच कपडे







कपड्याचं भूत जणू, हटेचना
राजाची हौस काही, फिटेचना

संधी साधून दोन गुंड आले राजापाशी
दरबारात मारू लागले, थापा बावनकशी

जगामधे दुर्मिळ असं कापड विणतो
जणू काही आमचा त्यात, जीवच ओततो


सोन्याच्या अतिबारीक, तारा आम्ही करतो
तारांपासून तलम, कपडा आम्ही विणतो

सोनेरी कापडावर, नक्षी विणतो चांदीची
जग सारं लट्टू होईल, गोष्ट लाखमोलाची

आमच्या कापडावरती असे, सुंदर रंग येतील
फुलंसुद्धा लाजून, माना खाली घालतील

आमच्या कापडात असते, एक जादू भारी
सोन्यापेक्षा चांदीपेक्षा, भलतीच न्यारी

ज्याला ज्याला अक्कल असेल
त्यालाच आमचं कापड दिसेल





राजावर जणू काही, जादू टोणा केला
राजा त्यांच्या तावडीत, अलगद गेला

मागतील तेवढं सोनं, हवी तेवढी चांदी
राजानं जणू काही, खुली केली तिजोरी

एक मोठा महाल, त्यांनी ताब्यात घेतला
सामानानी सगळा, भरून टाकला

बोलून चालून ते दोघे, राजाचे पाहुणे
अगत्याला मग, तिथे काय उणे?


त्यांना हवं ते ते, आत घेऊन जायचे
आत मात्र कोणाला, येऊ नाही द्यायचे

थोडं तरी कापड, विणून दाखवा
नमुना आमच्या, नजरेला दाखवा

काळजी काय करता राव? उद्याला या
सुंदर कापड, बघून जा

या या म्हणता, रात्र झाली
कापडाची बोली, तशीच राहिली

परत दुसरा, दिवस उजाडला
राजानं त्याचा, वजीर पाठवला





वजीर मोठ्या लगबगीनं, महालात पोचला
आत बघतो तर काय! बघतच बसला

विणकामाची चौकट, रिकामीच होती
विणकरांची जोडी मात्र कामात होती


विणकर दोघे, रंगलेले होते
रिकाम्या चौकटीवर, झुकले होते

कापड विणण्यात होते, गर्क अगदी
रंग लावण्याची, होती घाई गर्दी

महालात नव्हतं सोनं, चांदीही नव्हती
रिकामे कोपरे अन्, रिकाम्या भिंती

वजीराचे हातपाय, गळून गेले
केवढा हा धक्का! तोंड कोरडे पडले

विचारात पडला, कापड दिसत कसं नाही?
ताणा नाही बाणा नाही, काहीच कसं नाही?





कापड नाही दिसत, याला म्हणावं काय?
मला नाही अक्कल, असं म्हणतील काय?

गुंड कसले बनेल! डोळे मारत होते
चलाख, धूर्त, कपटी, बदमाश होते

मोठ्या अदबीनं, विचारतात काय
हुजूरांना कापड, पसंत पडलं काय?

हा पहा इथला, रंग किती सुंदर
हा मोरपंखी तर, उतरला अतिसुंदर

आणि नक्षीचा हा, नमुना तर पहावा
यातलं सोनं पाहून, म्हणालच वाहवा


वजीर पडला विचारात, काही बोलेना
'म्हणू तरी काय?' त्याला काहीच सुचेना



मग म्हणाला, वाहवा! वाहवा!
महाराजांचा थाट, काय विचारावा!

किती सुंदर काम, तुम्ही केलं आहे!
अतिसुंदर विलक्षण, कापड विणलं आहे

फिरत्या रंगाच्या तारा, किती नाजूक आहेत
त्यांच्यावरचे रंग तर, स्वर्गीयच आहेत



बावरलेल्या वजीरानं, सावरलं स्वत:ला
राजाजवळ गेला, अन् बोलायला लागला

महाराज, कापड फारच भारी झालंय्
अपूर्व झालंय, आणि वेगळंच झालंय्

त्यावर सोन्याची, फुलं काय दिसतायत्
जणू काही फुलांचे, गुच्छच हलतायत्

एकेक करून सगळेच, बघायला गेले
नाही फुलं दिसली, नाही गुच्छ दिसले

रिकामी चौकट पाहून, हैराण झाले
कापड काही दिसेना, गडबडून गेले


कुणाच्या तोंडून, शब्द फुटेना
गरगरणारं डोकं, ताळ्यावर येईना

स्तुतीशिवाय कोणी, काही बोलेना
गुंडांची जादू, काही उतरेना

आता राजाची, वेळ आली
कापडाची चौकट, ऐटीत बघितली

डोळे चोळून चोळून, बघू लागला राजा
त्याचाही वाजला होता, बेंडबाजा





कापडाचं तर कुठे, नाव दिसेना
सोन्या चांदीचाही, ठाव लागेना

चौकट सारी, रिकामी होती
गुंडांची जोडी, विणतच होती

आडवे काय विणत होते, उभे विणत होते काय
माझी अक्कल मलाही, सोडून गेली का काय?

मलाच अक्कल नसेल तर, राजा कोण म्हणणार?
तोंड दाखवायला कुठे, जागा नाही उरणार

प्रजेला हे कळलं तर, काय होईल?
आमचा सगळा रुबाब, नाहीसा होईल

शेवटी म्हणाला, 'काय म्हणू? शब्दच अपुरे आहेत
या कापडाचे कपडे, घालायचेच आहेत

हे कापड आता, ठेवायला नको
कपडे शिवायला, आता उशीर नको


गुंडांनी सुटकेचा, नि:श्वास टाकला
कापडाचा तागा, तयार झाला

आता आम्ही रजा घेतो, म्हणून निरोप घेतला
विश्रांतीसाठी म्हणून, काढता पाय घेतला









आता आली वेळ, शिंप्याची
राजानं सांगितली, आवड त्याची

कापड नव्हतं, चोपड नव्हतं
तरी शिवणं, चालू होतं

खोटं खोटं, माप घ्यायचा
अंदाजानं, कात्री चालवायचा

आता तो कपडे, शिवायला बसला
गुंडाचाही, गुरु झाला

हवेलाच तो, सुई टोचायचा
नसलेलं कापड, हाती धरायचा

शिवलेले कपडे, अलगद दाखवायचा
ही सलवार, हा झब्बा म्हणायचा



असा झाला शिवून पोषाख सगळा
समोरचा मोठा, प्रश्नच मिटला

आला वाढदिवस, राजाचा
नजराणा नव्या पोषाखाचा

हा कुर्ता आहे, हा पायजमा
आणि वर जाकिटाचा, जामानिमा

आरशासमोर राजाला, उभा केला
अदबीनं नवा, पोषाख चढवला

राजाला अंगावर, काहीच दिसेना
लाज वाटत होती, पण काहीच बोलेना

दरबारी मंडळींचे, डोळे मोठे झाले
वा वा म्हणत लबाड, बघत राहिले

आता निघाली, मिरवणूक राजाची
कौतुकानं बघायला गर्दी प्रजेची





राजाच्या अकलेचं दिवाळं वाजलं
नागडंच सोंग त्याचं, बाहेर निघालं

म्हणाला आम्ही आज, पायीच जाणार
नवे कपडे, प्रजेला दाखवणार

बघू तरी राज्यात, शहाणी लोकं किती?
बिनडोक किती, आणि बेअक्कल किती

माझ्या राज्यात वेड्यांना, जागा नाही
पुन्हा कधी त्यांचं तोंड पाहणार नाही

दरबारी सरदार, सोबत निघाले
सर्वांनी छानदार पोषाख घातलेले

मधोमध चालला, होता राजा
आणि पुढे राजाचा, बेंडबाजा

अशी शाही, मिरवणूक निघाली
सर्वांची भारी करमणूक झाली



राजाला बघायला गर्दी उसळली
धक्काबुक्की करत प्रजा, पुढे सरसावली

नवल वाटून, कित्येकांचे, आ ऽ वासले
राजाला बघून, डोळेच थिजले

कुर्ता नव्हता, पायजमा नव्हता
जाकीट नव्हतं, की शेला नव्हता

ही कसली मिरवणूक! तमाशा होता
राजा तर अगदीच, नंगा होता

पण तसं तोंडानं, म्हणणार कोण?
राजाला खरं, सांगणार कोण?

सगळे म्हणत होते, वाहवा! वाहवा!
किती सुंदर पोषाख! सुंदर राजा पहावा

तेवढ्यात एक, छोटा मुलगा आला
होता गोरा गोरा, आणि गोंडस गोबरा

त्याला राजा, जेव्हा दिसला
टाळ्या वाजवून, लगेच म्हणाला

राजा नागड धुव्या! नागड धुव्या राजा!
बघा तरी गंमत! बघा तरी मज्जा!





